# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
# मानव्यविज्ञान विद्याशाखा अंतर्गत विद्यावाचस्पती (मराठी) पदवी करीता सादर करावयाच्या नियोजित शोधप्रबंधाचे संक्षिप्त प्रारूप

## शोधप्रबंधाचे शीर्षक
**२००१ ते २०१० या दशकातील आंबेडकरी कादंबरी : एक चिकित्सक अभ्यास**


**संशोधक**

**संतोष रघुनाथ कांबळे**

**ता.जि.परभणी ४३१४०१**

**मार्गदर्शक**

**प्रा. डॉ. शत्रुघ्न जाधव**

**मराठी विभाग प्रमुख (पदवी व पदव्युत्तर)**

**आदर्श कॉलेज, हिंगोली. ४३१५१३.**

**संशोधन केंद्र**

**भाषा, वाङ्मय आणि सांस्कृतिक अभ्यास संकुल**

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**


**२०२२.**

## २००१ ते २०१० या दशकातील आंबेडकरी कादंबरी : एक चिकित्सक अभ्यास
## प्रास्ताविक,

मराठी साहित्यामध्ये जे विविध वाङ्मयप्रवाह उदयास आले आहेत, त्यामुळे एकूण मराठी समाज, संस्कृती व साहित्यामध्ये आमूलाग्र बदल घडून आले असून हे परिवर्तनवादी साहित्य मानवमुक्ती संघर्षाचे प्रमुख साधन होते. विविध प्रकारची साहित्य निर्मिती मोठ्या प्रमाणात होत होती. त्यापैकी दलित साहित्य प्रवाह हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित झाल्यामुळे त्यालाच आंबेडकरी साहित्य प्रवाह म्हणून नवी ओळख निर्माण झाली आहे. समाजाचा सर्वांगीण विकास शोषण मुक्त समाज निर्मित करणे हा हेतू ठेऊन आंबेडकरी कथा, कविता, आत्मकथन, नाटक व कादंबरी आदी साहित्य प्रकारांची मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तळागाळातील समाजाला अन्याय-अत्याचार, मानसिक शोषण कर्मकांड, अंधश्रद्धा, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व आर्थिक परिस्थितीतील दिनदलितांना चातुर्वण्य व्यवस्थेमधून बाहेर काढून जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था आणि मानवातील हा भेदा-भेद दूर करून त्यांनी समाजाला "शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा" हा संदेश दिला. दलित साहित्य हे आंबेडकरी विचाराचे प्रतिबिंब आहे., त्यामुळे आजच्या घडीला 'आंबेडकरी साहित्य' असे त्याचे नामाभिधान झालेले आहे. या विचारातून झालेल्या कादंबरी लेखनाचा अभ्यास करणे उपयुक्त ठरते. २००१ ते २०१० या दहा वर्षाच्या कालखंडामध्ये आंबेडकरी साहित्याने कविता, कथा, कादंबरी, नाटक व आत्मकथन अशा विविध प्रकारात लिखाण केले आहे. परंतु या सर्व प्रकारातील केवळ कादंबरी लेखनाचा अभ्यास या ठिकाणी करावयाचा आहे.

## विषय निवडी बाबतीची भूमिका :-

"२००१ ते २०१० या दशकातील आंबेडकरी कादंबरी : एक चिकित्सक अभ्यास" या विषयीची संशोधनासाठी निवड करताना प्रामुख्याने संशोधन क्षेत्रातील एक दुर्लक्षित वाङ्मय प्रकार म्हणून आंबेडकरी कादंबरी विषयीची परिस्थिती आहे. आंबेडकरी साहित्यातील कविता, कथा, आत्मकथन व नाटक या वाङ्मय प्रकारांचे जेवढे अध्ययन समीक्षण व संशोधन झाले त्या तुलनेत कादंबरी हा प्रकार तसा मागे पडलेला आहे. आंबेडकरी कादंबरीचे स्वरूप आशय व अभव्यक्ती दृष्ट्या विविधांगी प्रकारची आहे. म्हणून प्रस्तुत संशोधन प्रबंधासाठी कादंबरी या प्रकारची निवड केलेली आहे.

## संशोधन कार्याचा उद्देश:-

१) २००१ ते २०१० या दशकातील आंबेडकरी कादंबरी नेमकी कोणत्या दिशेने प्रवास करत आहे याविषयी कादंबरी निर्मितीची चिकित्सा करणे.
२) आंबेडकरी कादंबरीतील समाज दर्शन, विद्रोह व भाषा या तीन अंगाचा अभ्यास करणे त्यासाठी दशकातील आंबेडकरी कादंबरी अभ्यासणे.
३) प्रस्थापित मराठी कादंबरी प्रवाहात आंबेडकरी कादंबरीतील वेगळेपण अभ्यासणे.
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा आंबेडकरी साहित्यात आहे, तशी ती प्रेरणा आंबेडकरी कादंबरीतून कितपत दिसते याचा अभ्यास करणे.
५) समाजातील उपेक्षित समाजाला भोगाव्या लागणाऱ्या यातना आंबेडकरी कादंबरीतून कशा प्रकाट होतात याचा अभ्यास करणे.
६) समाजातील उपेक्षित वर्गावर प्रस्थापित समाज व्यवस्थेने अन्याय ,अत्याचार केले या चित्रणासह या उपेक्षित वर्गाने केलेल्या विद्रोहाचे स्वरूप आंबेडकरी कादंबरीतून समजून घेणे.
७) आंबेडकरी कादंबरीतील समाजदर्शन, विद्रोह व भाषा  या अनुषंगाने मूल्यमापन करणे.

## गृहितके:-

१) गौतम बुद्ध, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव आंबेडकरी कादंबरीतून दिसून येतो अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आंबेडकरी साहित्याची प्रेरणा आहे. तशीच आंबेडकरी कादंबरीतही तीच प्रेरणा आहे.
२) आंबेडकरी कादंबरीतून सामाजिक अन्याय व शोषण व्यक्त होते.
३) विद्रोह हा आंबेडकरी साहित्याचा महत्वाचा घटक आंबेडकरी कादंबरीतही दिसून आहे.
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर व गौतम बुद्ध यांच्या विचारांचा प्रभाव आंबेडकरी कादंबरीतून दिसून येतो.
५) मानवीमूल्ये आंबेडकरी कादंबरीतून मांडलेली आहेत.
६) 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा हि त्रिसूत्री आंबेडकरी कादंबरीने स्वीकारली आहे.
७) आंबेडकरी कादंबरीने स्वतःचे वेगळेपण सिद्ध केले आहे.
८) आपल्या हक्कांसाठी संघर्ष व लढा देणारे समाज आंबेडकरी कादंबरीत दिसून येतो.
९ ) प्रस्थापित मराठी कादंबरीतील भाषेपेक्षा आंबेडकरी कादंबरीची भाषा वेगळी आहे.
१०) आंबेडकरी कादंबरीने मराठी कादंबरी विश्वात आपले वेगळेपण जपले आहे.

## संशोधन पद्धती:-

१) संशोधन कार्यासाठी ग्रंथांचा, मासिकांचा, संदर्भ ग्रंथांचा, लेखांचा, इंटरनेट वरील साधनांचा आधार घेण्यात येणार आहे.
२) प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संबंधित विविध अशा साहित्य शंका, निरसन संशोधन माहितीसाठी, विविध साहित्यिक व संबंधित मंडळींकडून मोबाईल, व्हाट्सअप, पत्रव्यवहार या दृष्टिकोनातून माहिती मिळवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.
३) संबंधित विषयातील विषय विवेचन यासाठी परिचयात्मक, वर्णनात्मक, ग्रांथीक पद्धती व विश्लेषणात्मक अभ्यास पद्धतीचा उपयोग केला जाईल.
४) आंबेडकरी साहित्यातील साहित्यिकांची माहिती देणाऱ्या साधनांचा उपयोग केला जाईल ही माहिती प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मिळविली जाईल.
उदा. ध्वनीफित, चलचित्रे, वर्तमानपत्रे, मासिके, युट्यूब, भाषणे व धम्म परिषद इत्यादी साधनांचा उपयोग केला जाईल.

## संशोधनाची उपयोगिता:-

१) २००१ ते २०१० च्या दशकातील आंबेडकरी कादंबरीवर संशोधन झाल्यास हे संशोधन वाचक, अभ्यासक व इतर संशोधकांसाठी उपयोगी पडणार आहे.
२) मानवता या मानवी मूल्यांचा परिपोष या दशकातील आंबेडकरी कादंबरीतून व्यक्त होतो. ही बाब तमाम चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी व लेखकांसाठी उपयोग होतो.
३) मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांसाठी हे संशोधन एक वेगळे दृष्टिकोन म्हणून उपयोगाचे होईल.
४) या अभ्यासातील सामाजिक चित्रणाचे निष्कर्ष सामाजिकशास्त्रातील अभ्यासकांसाठी उपयोगी

ठरेल.

५) या दशकातील आंबेडकरी कादंबरीतील भाषेसंबंधीचे विवेचन अध्ययन भाषाविषयाच्या अभ्यासकांसाठी उपयोगी ठरेल.

६) या दशकातील आंबेडकरी कादंबरीचा अभ्यास मराठी कादंबरी व समीक्षा या क्षेत्रात मोलाची भर घालणारा ठरेल.

## संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा:-

**व्याप्ती:-**

संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. "२००१ ते २०१० या दशकातील आंबेडकरी कादंबरी : एक चिकित्सक अभ्यास" या विषयीचे संशोधन करण्यासाठी केवळ दहा वर्षाचा काळ निवडला असला तरी २००१ पूर्वीच्या प्रस्थापीत मराठी कादंबरीचा व आंबेकरी कादंबरीचा विचार करावा लागतो म्हणून या विषयाची व्याप्ती केवळ दहा वर्षे होत नाही, तर त्यापेक्षा  अधिक होते. केवळ आंबेकरी कादंबरीचा विचार या अभ्यासासाठी केला असला तरी मराठीतील सर्वच कादंबरी वाङ्मयाचा पर्यायाने विचार कारावा लागतो म्हणून या विषयाची व्याप्ती मोठी आहे..

**मर्यादा:-**

"२००१ ते २०१० या दशकातील आंबेडकरी कादंबरी : एक चिकित्सक अभ्यास" या विषयीचे संशोधन करण्यासाठी केवळ 'आंबेडकरी कादंबरी' विशेष करून निवडली आहे. दहा वर्षाचा कालखंड अभ्यासासाठी निवडला गेला आहे. संबंधित आंबेडकरी कादंबरीत समाज,  भाषा व विद्रोह दृष्टिने संशोधन करणे अभिप्रेत आहे. आंबेडकरी कादंबरीतुन प्रकटलेले सामाजिक, भाषिक व विद्रोह यांचा अभ्यास प्रस्तुत दशकात आंबेडकरी विचारांचा प्रभाव आंबेडकरी कादंबरीमध्ये कसा प्रकटतो याचे मूल्यमापन करणे. आंबेडकरी कादंबरीमधील आंबेडकरी विचारांचे प्रकटीकरण अभ्यासकांना व संशोधनकांना यथायोग्य माहिती करून देणे.

## "२००१ ते २०१० या दशकातील आंबेडकरी कादंबरी : एक चिकित्सक अभ्यास" या विषयावरील संकल्पित शोध प्रबंधाचे  प्रकरण निहाय प्रारूप पुढील प्रमाणे आहे.

**प्रकरण १  - आंबेडकरी साहित्य प्रवाहाचे स्वरूप.**
**प्रकरण २  -  आंबेडकरी  कादंबरीतील समाजदर्शन**
**प्रकरण ३  - आंबेडकरी  कादंबरीतील विद्रोह.**
**प्रकरण ४  - आंबेडकरी कादंबरीतील भाषा.**
**प्रकरण ५  - दशकातील आंबेडकरी कादंबरीचे मूल्यमापन.**
**प्रकरण ६  -**

**अ) उपसंहार/समारोप.**

**ब) निष्कर्ष.**

या अभ्यासाअंती हाती आलेले निष्कर्ष सदरील प्रकरणात मांडण्यात येतील

## सूची :-

### १. साधन ग्रंथसूची (२००१ ते २०१० या दशकातील आंबेडकरी कादंबरी सूची)

पोतराज (२०००) गायकवाड चंद्रकांत, अस्वस्थ नायक (२०००) उत्तम कांबळे, फिरकी (२०००) मिरकर अरुण, कसरत (२००१) सपकाळ सुशीला, सेलझाड (२००१) कांबळे नामदेव, आता उजाडले (२००१) कोंडविलकर माधव, हाताची घडी तोंडावर बोट (२००१) कोंडविलकर माधव,भारत सेल होताना (२००१) रामटेके सिद्धांत, कोंडी (२००२) बाबुराव बागुल, भाडास (२००२) कुमार अनिल, अभिसरण (२००२) ऐनापुरे जी. के., हिंदू (२००३) शरणकुमार लिंबाळे, मी सावित्री (२००४) मनोहर यशवंत, रमाई (२००४) मनोहर यशवंत, एक होती कातळवाडी (२००४) कोंडविलकर माधव, मी यशोधरा (२००४) मनोहर यशवंत ,धुराळा (२००५) वाघमारे योगीराज, शंभू आणि पिळ (२००५) ल. सी. जाधव, पडझड (२००५) वाघमारे योगीराज, ब्र (२००५) कविता महाजन, बहुजन (२००६) शरणकुमार लिंबाळे, मी सावित्री जोतिराव (२००७) कविता मुरूमकर, भूमीपुत्र (२००८) कोंडविलकर माधव, झुंड (२००९) शरणकुमार लिंबाळे, दंगल (२००९) शरणकुमार लिंबाळे, कोयत्याचं कोक - उत्तम कांबळे, बुद्धाचा रहाट - उत्तम कांबळे, पन्नास टक्क्यांची ठसठस उत्तम कांबळे, मिरवणूक - उत्तम कांबळे, चक्री- भीमसेन देठे, घुसमट - भीमसेन देठे, इस्कोट - भीमसेन देठे, झाकळ- भीमसेन देठे, ऊन सावली- कांबळे नामदेव, महाउम्मग जातक -डॉ. कमलाकर कांबळे, यशोधरा-करुणा जमदाडे, जातीला जात वैरी-रामचंद्र नलावडे, धूपत्री-गणपत भिसे, आग - डॉ.बाबुराव गायकवाड, झळ -डॉ.बाबुराव गायकवाड, काहिली- अनंत राऊत, पायपीट - अनिल मनोहर, व इतर.

## २. संदर्भ ग्रंथसूची


१)- निळी पहाट,………………………………………………… रा .ग. जाधव, विजय प्रकाशन
२)- दलित साहित्य………………………………………… डॉ. नीला पांढरे, स्नेहवर्धन प्रकाशन
३)- ग्रामीण व दलित साहित्य चळवळ आणि समीक्षा…..डॉ.मधुकर मोकाशी, स्नेहवर्धन प्रकाशन
४)- भारतीय दलित साहित्य………………………..संपा- शरणकुमार लिंबाळे, साहित्य अकादमी
५)- दलित साहित्य वेदना आणि विद्रोह ………………………भालचंद्र फडके, श्री विद्या प्रकाशन
६)- नामांत्तर आंदोलन, …………………………………………..डॉ.राजेंद्र शिंदे, निर्मल प्रकाशन
७)- आंबेडकरी चळवळीचा इतिहास………………… प्राचार्य.डॉ.एस. एस.गाठाळ, कैलाश पब्लिकेशन
८)- दलित साहित्याचा इतिहास ………………. प्राचार्य डॉ. म. सू. पगारे, विद्या बुक पब्लिकेशन
९)- दलित समीक्षेचे स्वरूप……………………………………………………… डॉ.शत्रुघ्न जाधव.
१०)- दलित साहित्य : एक आकलन…………………………बाळकृष्ण कवठेकर, विजय प्रकाशन
११)- आंबेडकरी, साहित्यातील जीवमूल्ये ……………..प्रा.अशोक आर इंगळे, शब्दालय प्रकाशन.
१२)- दलित साहित्याची संकल्पना…………………. ……डॉ. जयेंद्र व्हटकर, दिलीपराज प्रकाशन.
१३)- दलित साहित्य चिकित्सा…………………………………… स. द .कऱ्हाडे, स्वरूप प्रकाशन

१४)- धम्म चळवळी आणि स्थिती गती..........................मोतीराम कटारे, सुगावा पब्लिकेशन
१५)- दलित साहित्य काही विचार काही दिशा..........प्राचार्य डॉ. प्रकाश कुंभार, कैलाश पब्लिकेशन

## ३. दैनिके -मासिके -नियतकालिके सूची .

दैनिक लोकमत, दैनिक सकाळ ,सम्राट, अस्मितादर्श, समाज प्रबोधन पत्रिका ,लोकराज्य.

## ४. आंतरजाल संदर्भसूची.

**https://www.bookganga.com, https://ycmou.digitaluniversity, http://www.esahity.com, https://epustakalay.com**

“२००१ ते २०१० या दशकातील आंबेडकरी कादंबरी: एक चिकित्सक अभ्यास" या विषयावरील प्रबंधलेखन करताना, प्रत्येक्ष अभ्यास करतेवेळी संकल्पित संशोधन आराखड्यात अंशतः काही बदल करण्याची गरज पडली तर मार्गदर्शकांच्या संमतीने तेवढे बदल केले जातील

**संशोधक,**

**संतोष रघुनाथ कांबळे.**
**ता.जि.परभणी ४३१४०१.**
**मो.नं.: ८२७५४२६६९८,**
**७०२०५९७१७८.**
**ई-मेल:-srkamble358@gmail.com**

**मार्गदर्शक,**

**प्रा.डॉ.शत्रुघ्न जाधव.**
**मराठी विभाग प्रमुख,(पदवी व पदव्युत्तर)**
**आदर्श कॉलेज, हिंगोली.४३१५१३**
**मो .नं. ९८२२२४२२६२**
**ई-मेल:-shatrughnagjadhav@gmail.com**